**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर**

सचिव कार्यालय
दिनांकः- २५/८/२००८

**प्रति,**
मा. --------------------------------------
स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा **क्र.१० शुक्रवार दिनांक २९/८/२००८ सकाळी ११.००** वाजता स्थायी समिती कार्याल्यात खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण सर्वांनी उपस्थित रहावे हि विनंती.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- १०**

**सन-२००८-२००९**

**शुक्रवार दिनांक. २९/८/२००८ ची विषय पत्रिका.**

**विषय क्रं.** **विषय**

१. मा.स्थायी समिती समिती सभा क्रमांक ९ सोमवार दिनांक ११/८/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

२. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९मधील तरतुदीनुसार अहमदनगर महानगर पालिकेचे ॲडव्होकेट पॅनलवर दोन वकीलांच्या तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नेमणूका करणेस तसेच त्यांचे मानधन व कालावधी ठरविणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

३. अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र.८मधील अर्चना हॅाटेल वैभव पशुखाद्य व भाग्योदय मंगल कार्याल्यापर्यत१५०वॅट सोडीयम व्हेपर फिटींग व टयुबलर पोल टाकणे इ.कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता वऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.[अंदाजपत्रकीय रक्कम रूपये२५,६२,०८४/-]

४. अहमदनगर महनगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ८ मधील रंगोली हॅाटेल ते कारमिनल हायस्कुल पर्यत नवीन टयुबलर पोल फिटींग व अंन्डर ग्राउन्ड केबल टाकणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. [अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ९,९०,५२५/-]

५. अहमदनगर महानगरपालिकेचे नगररचना विभागामार्फत नागरिकांना आवश्यक असलेले झोन दाखले, भाग नकाशे, रेखाकंन, बांधकाम आराखडे, सत्य प्रती इत्यादी पुरविण्यांत येणा-या कागद पत्रांसाठी आकारण्यात येणा-या प्रचलित दरास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

६. अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १ मधील हुंडेकरी ट्रान्सपोर्ट ते आठरे पाटिल विद्यालय, नंदनवन नगर, अप्सरा कॉलनी, पवननगर , गोकुळ कॉलनी अंतर्गत १५० वॅट सोडियम व्हेपर पोल फिटींग व अन्डर ग्राउन्ड केबल टाकणे कमी मागविण्यात आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. [अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ६३,४१,३९८/-]

७. अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १३ मधील अण्णाभाउ साठे चौक ते कंरदीकर हॉस्पीटल ते बालीकाश्रम रस्त्यापर्यत डांबरीकरण करणे कामी मागविण्यात आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. [अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १०,३०,९५९/-]

८. अहमदनगर महानगरपालिकेचे शहर पाणी पुरवठा योजने वरील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २००८-२००९ सालचे वार्षिक दर ठरविणे कामी मागविण्यांत आलेल्या गट क्रमांक १ ते ६ चे निविदा दराचे तुलनात्मक तक्ते व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

९. अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ७ मधील केडगांव नवीन गांवठाण अंतर्गत व ताराबाई कन्या विद्यालय परिसरातील रस्त्याचे डांबरीकरणाचे काम मागासवर्गीय कल्याणकारी योजनेचे निधीतुन करणेस व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ८,५२,९५८/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

१०. अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ७ मधील केडगांव नवीन गांवठाण येथील ओंकार कम्युनिकेशन ते पांच गोडावून ते हंगवले घर ते श्रीसंत कृपा ते दिक्षा ब्युटी पार्लर, साठे ते साळवे, राजे ते पांच गोडावून या मुख्य रस्त्याचे डांबरीकरणाचे काम मागासवर्गीय कल्याणकारी योजनेचे निधीतुन करणेस व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ८,२९,९७४/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

११. अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र.७ मधील केडगांव नवीन गावठाण दत्त मंदिर परिसरातील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरणाचे काम मागासवर्गीय कल्याणकारी योजनेचे निधीतुन करणेस व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ४,९९,२६१/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

१२. अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक१ मधील नागापुर स्लम भागातील अंतर्गत रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. [अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ११,४९,६३०/-]

१३. अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १८ स्वामी विवेकानंद पुतळा चौक येथील म.न.पाचे शितळा देवी पटांगणा मधील प्रगतीत असणा-या व्यायाम शाळेच्या बांधकामामध्ये करावयाच्या वाढीव कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २,४९,२९७/- चे वाढीव खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

१४. अहमदनगर महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या प्राथमिक शाळेतील तीनशे विद्यार्थाची ऐतिहासिक सांस्कृतिक व शैक्षणिक सहल आयोजित करणे बाबत डायरेक्टर केंट क्लब कोल्हापूर यांचे पत्र व त्या वरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत**- मा.स्थायी समिती सभा क्रमांक९ सोमवार दिनांक ११/८/२००८ रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत व विषय-क्रमांक २ ते १४ च्या प्रस्तावांच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**

सन २००८-२००९

<u>विषय क्रमांक- १ शुक्रवार दिनांक २९/८/२००८</u>

ठराव क्रमांक -१ शुक्रवार दिनांक २९/८/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक ९ सोमवार दिनांक ११/८/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर** :- मा.स्थायी समिती सभा क्रमांक ९ सोमवार दिनांक ११/८/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे साठी मा.स्थायी समिती सभे पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मागिल सभा सोमवार दिनांक ११/८/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे आहे. मा. सदस्यांनी त्या विषयी आपल्या सुचना दुरूस्त्या सांगाव्यात.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- मागिल सभेचे कार्यवृत्त मंजूर करावे.

मा.सौ. खरपुडे ज.सु. :- कार्यवृत्त मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :- मागिल सभा सोमवार दिनांक ११/८/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यांत यावे.

**<u>ठराव :-</u>** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ९ सोमवार दिनांक ११/८/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा. श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन.

अनुमोदक :- मा.सौ. खरपुडे जयश्री सुरेश.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**
सन २००८-२००९

विषय क्रमांक- २ शुक्रवार दिनांक २९/८/२००८

ठराव क्रमांक -२ शुक्रवार दिनांक २९/८/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार अहमदनगर महानगरपालिकेचे ॲडव्होकेट पॅनलवर दोन वकीलांच्या तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नेमणूका करणेस तसेच त्यांचे मानधन व कालावधी ठरविणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रस्तावना-विषय- अहमदनगर महानगरपालिकेकरिता मा.न्यायालयामध्ये अपील प्रकरणी ॲडव्होकेट यांची तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नियुक्ती बाबत.

मा. महापौर साहेब यांनी मा. न्यायालयामध्ये अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याने त्याकामी मनपाच्या ॲडव्होकेट पॅनलवर दोन वकीलांच्या नेमणुका करण्याबाबत सुचित केलेले आहे.

तरी अहमदनगर महानगरपालिकेच्या पॅनलवर तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नेमणुकी बाबत कालावधी निश्‍चित करून व किती मानधनावर नेमणुक करावयाची याबाबतचा निर्णय होवुन सदरचा विषय मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव ठेवणेस मंजूरीस्तव सादर.

सोबत- संपुर्ण मुळ प्रकरण

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख श्री. व्हि.एस.थोरात यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेबः-ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत यावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- म.न.पाचे ॲडव्होकेट पॅनल वर दोन वकीलांच्या नेमणूका करणे आहे. त्याची प्रोसिजर कशी राहणार.?

मा.सहाय्यक आयुक्त श्री.देशमुख साहेबः-आस्थापना विभाग प्रमुख यांना सभे मध्ये बोलविण्यात यावे. ते माहिती देतील.

मा.सभापती साहेब :- आस्थापना विभाग प्रमुख यांना सभेमध्ये बोलविण्यांत यावे.

त्याप्रमाणे (प्रभारी) आस्थापना विभाग प्रमुख श्री. तडवी,एस.बी. हे सभेमध्ये उपस्थीत झाले.

मा.सभापती साहेब :- म.न.पा.चे ॲडव्होकेट पॅनलवर करावयाच्या वकीलांच्या नेमणूकीची प्रोसिजर सांगावी. आपण आस्थापना विभाग प्रमुख म्हूनन नवीन आहात.

मा.सहाय्यक आयुक्त श्री. देशमुख साहेब :- ॲडव्होकेट पॅनलवर नेमणूका करणे प्रकरणी वर्तमान पत्रामध्यें जाहिरात देण्यांत येउन इच्छुकांचे अर्ज मागविण्यांत आल्यानंतर त्याच्या मुलाखती घेउन सदरच्या नेमणूका रितसर करणेत येतील.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.:- म.न.पाचे ॲडव्होकेट पॅनलवर नेमणेत येणा-या वकीलांनी फक्त म.न.पा.चे च काम पहावे. खाजगी काम करू नये अशा अटी वर त्यांच्या नेमणूका करणेत याव्यात.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- त्याकरिता म.न.पाचे आस्थापने वर विधी सल्लागारांची पदे निर्मिती करून कायम नेमणूका करणे आवश्यक आहे.

मा.सभापती साहेब :- आपण ॲडव्होकेट पॅनल वरील वकीलांना किती मानधन देतो आहोत.

कामगार अधिकारी श्री. ढाकणे आर.एम. :- अहमदनगर येथील दिवाणी व मा. जिल्हा न्यायालय तसेच मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडापीठ येथील कामकाज पहाणारे ॲडव्होकेट सौ. नगरकर व श्री. लटांगे यांना दरमहा रूपये नऊ हजार फक्त व मा. औध्योगिक व कामगार न्यायालयातील कामकाज पहाणारे ॲडव्होकेट श्री.एस.के.पाटील यांना दरमहा रूपये बारा हजार फक्त प्रमाणे मानधन देण्यांत येते आहे.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- नविन नेमणूका करावयाच्या वकीलांना पुर्वी प्रमाणेच दरमहा मानधन रूपये नऊ हजार प्रमाणे मानधन देण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री.तिवारी सु.र.: आपले म.न.पाचे वकील मे. कोर्टातील काम चांगले पहात नाहीत. ॲड. नगरकर मॅडम यांना बदलण्यात यावे.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- म.न.पा.चे काम पहाणेसाठी नेमलेले वकील चांगले काम करीत नाहीत.त्याचे काम असमाधान कारक असल्याने त्यांना बदलण्यात यावे. त्याची काय प्रोसिजर आहे.?

मा.सहाय्यक आयुक्त श्री. देशमुख साहेबः-आपण तसा निर्णय घेऊ शकता ठरावामध्ये त्याप्रमाणे उल्लेख करणेत यावा.

मा.श्री.शेख आरिफ शे.र.:-ॲड.नगरकर मॅडम यांना बदलण्यात यावे. त्याचे जागी व नवीन दोन अशा एकुण तीन वकीलांच्या नेमणूका रूपये नऊ हजार प्रमाणे दरमहा मानधनावर करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- त्यांना किती कालावधी साठी नेमावे.

मा.सहाय्यक आयुक्त श्री. देशमुख साहेब :- कालावधी आपण ठरवावा.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- पांच वर्षासाठी नेमणूक करावी.

मा.सौ.पवार सं.बा. :- तीन वकीलांचा नेमणूका पांच वर्षासाठी करण्यांत याव्यात. ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :-अहमदनगर महानगरपालिकेचे ॲडव्होकेट पॅनलवरील ॲडव्होकेट सौ. स्वाती नगरकर मॅडम यांचे काम समाधान कारक नसलेने त्याची म.न.पा.चे ॲडव्होकेट पॅनलवर केलेली नेमणूक रद्द करण्यांत येऊन नवीन तीन वकीलांची ॲडव्होकेट पॅनल वर पांच वर्षासाठी मानधन रूपये नऊ हजार फक्त चे मानधनावर नेमणूका करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

**<u>ठराव :-</u>** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार अहमदनगर महानगरपालिकेचे ॲडव्होकेट पॅनलवर दोन वकीलांच्या तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नेमणूका करणेस तसेच त्यांचे मानधन व कालावधी ठरविणे बाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

**१]** अहमदनगर महानगरपालिकेचे ॲडव्होकेट पॅनल वर असलेल्या ॲडव्होकेट सौ. स्वाती नगरकर यांचे मे. कोर्टातील काम असमाधान कारक असल्याने त्यांची म.न.पाचे विधी सल्लागार म्हणून केलेली नेमणूक रद्द करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

**२]** म.न.पा.चे ॲडव्होकेट पॅनलवर एकुण तीन वकीलांच्या नेमणूका दरमहा रूपये ९,०००/- ( रूपये नऊ हजार फक्त ) चे मानधनावर पांच वर्षासाठी नेमणूका करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा. श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन.

अनुमोदक :- मा.सौ. पवार संध्या बाळासाहेब.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**
सन २००८-२००९

विषय क्रमांक- ३ शुक्रवार दिनांक २९/८/२००८
ठराव क्रमांक -३ शुक्रवार दिनांक २९/८/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ८ मधील अर्चना हॉटेल वैभव पशुखाद्य व भाग्योदय मंगल कार्यालयापर्यत १५०वॅट सोडीयम व्हेपर फिटींग व टयुबलर पोल टाकणे इ. कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.[अंदाजपत्रकीय रक्कम रूपये२५,६२,०८४/-]

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय-निविदा मंजुरी बाबत.

कामाचे नाव :- अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर प्रभाग क्र. ८ मधील अर्चना हॉटेल ते वैभव पशुखाद्य व भागोदय मंगल कार्यालयापर्यत १५० वॅट सोडियम व्हेपर पोल टाकणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयी खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता :- मा.स्थायी समिती सभा क्र.३ व विषय / ठराव क्र.५ दि. २९/४/२००८
२] प्रशासकीय मान्यता रक्कम :- रूपये २५,६२,०८४/-
३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. :- रूपये २५,६२,०८४/-
४] तांत्रिक मान्यतेची दरसुची :- २००७-२००८
५] निविदा ( परिशिष्ट 'ब') रक्कम :- रूपये २५,६२,०८४/-
६] निविदा प्रसिध्दी तारीख :- दि. २०/५/२००८
७] निविदा विक्री कालावधी :- दि. २१/५/२००८ ते दि. ७/६/२००८
८] निविदा स्विकारण्याची दि. :- दि. १०/६/२००८
९] निविदा उघडण्याची तारीख :- दि. १०/६/२००८
१०]कामाची मुदत :- २ महिने
११]प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालिल प्रमाणे :-

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | मे. ॲना लाईट हाउत्र्स, अहमदनगर | ११.८० % ज्यादा |
| २ | मे. मयुरेश इलेक्ट्रिकल इंजिनियर्स, अहमदनगर | २२.४ % ज्यादा |
| ३ | मे. निखील इलेक्ट्रिकल, अहमदनगर. | १९.४० % ज्यादा |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने मे. ॲना लाईट हाउत्र्स, अहमदनगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे निविदा रकमेच्या ११.८० % ज्यादा आहे. कमी दराच्या निविदा धारकास दि. २८.७.२००८ रोजी दराचे वाटाघाटीसाठी पत्र दिले असता त्यांनी निविदा दरापेक्षा ५% ज्यादा दराने काम करण्याचे लेखी पत्र दि. २८.७.२००८ रोजी दिले आहे. चालु दरसुचीचे दर धरून कामाची अदयावत किंमत काढली असता निविदा धारकाची निविदा ही अदयावत किंमतीपेक्षा ५% ज्यादा येत आहे. सदरचे प्रस्ताव मा.छाननी समितीसमोर दिनांक २.०८.२००८ रोजी ठेवला असता छाननी समितीने सदरचे काम निविदा दरापेक्षा ५% दराने निविदा मंजुरीची शिफारस केली असुन मा. आयुक्त साहेबांनी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर निर्णयास्तव सादर करणे कामी सादर.

येणे प्रमाणे इले. सुपरवायझर श्री. बाळासाहेब सावळे यांचा अहवाल असे.दि.१२/८/०८
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ८ मधील अर्चना हॅाटेल वैभव पशुखाद्य व भाग्योदय मंगल कार्यालयापर्यंत १५०वॅट सोडीयम व्हेपर फिटींग व टयुबलर पोल टाकणे इ. कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.
[अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २५,६२,०८४/-]

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक ८ मधील सोडीयम व्हेपर फिटींग व टयुबलर पोल टाकणे कामी आलेल्या निविदा दरास मंजूरी देणे विषयीचा प्रस्ताव आहे.

मा.सौ. पवार सं.बा. :- ऑफिस रिपोर्टानुसार कमीचे दर मंजूर करावे.

मा.सौ. दिघे वि.रा. :- मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार आलेले कमीचे निविदा दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ८ मधील अर्चना हॅाटेल वैभव पशुखाद्य व भाग्योदय मंगल कार्यालयापर्यंत १५०वॅट सोडीयम व्हेपर फिटींग व टयुबलर पोल टाकणे इ. कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता छाननी समितीने शिफारस केल्यानुसार स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक मे. ॲना लाईट हाउस, अहमदनगर यांनी निगोशिएशन नंतर कमी करून दिलेल्या निविदा रकमे पेक्षा ५% (पांच टक्के) जादाचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ. पवार संध्या बाळासाहेब.

अनुमोदक :- मा. सौ. दिघे विमल रामचंद्र.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**

सन २००८-२००९

विषय क्रमांक- ४ शुक्रवार दिनांक २९/८/२००८

ठराव क्रमांक - ४ शुक्रवार दिनांक २९/८/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महनगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ८ मधील रंगोली हॉटेल ते कारमिनल हायस्कुल पर्यत नवीन टयुबलर पोल फिटींग व अन्डर ग्राउन्ड केबल टाकणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. [ अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ९,९०,५२५/-]

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय-निविदा मंजुरी बाबत.

कामाचे नाव :- अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर प्रभाग क्र. ८ मधील रंगोली हॉटेल ते स्कारमील हायस्कुल पर्यत नवीन टयुबलर पोल फिटींग व आंडरग्राउंड केबल टाकणे.

महोदय,

उपरोक्त विषयी खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता :- मा.स्थायी समिती सभा क्र. व विषय / ठराव क्र. दि.

२] प्रशासकीय मान्यता रक्कम :- रूपये ९,९०,५२५/-

३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. :- रूपये ९,९०,५२५/-

४] तांत्रिक मान्यतेची दरसुची :- २००७-२००८

५] निविदा ( परिशिष्ट 'ब') रक्कम :- रूपये ९,९०,५२५/-

६] निविदा प्रसिध्दी तारीख :- दि. ०४/४/२००८

७] निविदा विक्री कालावधी :- दि. ०५/४/२००८ ते दि. २५/०४/२००८

८] निविदा स्विकारण्याची तारीख :- दि. २८/०४/२००८

९] निविदा उघडण्याची तारीख :- दि. १३/५/२००८

१०]कामाची मुदत :- ४ महिने

११]प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालिल प्रमाणे :-

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | मे. उरमुडे इलेक्टो मेक इंडस्ट्रीज, अहमदनगर | २७.०० % ज्यादा |
| २ | मे. मयुरेश इलेक्ट्रिकल इंजिनियर्स, अहमदनगर | २५.१० % ज्यादा |
| ३ | मे. ज्योती इलेक्ट्रिकल सेंटर, अहमदनगर | ३०.०० % ज्यादा |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने मे. मयुरेश इलेक्ट्रिकल इंजिनियर्स, अहमदनगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे निविदा रकमेच्या २५.१० % ज्यादा आहे. कमी दराच्या निविदा धारकास दि. १०.६.२००८ रोजी दराचे वाटाघाटीसाठी पत्र दिले असता त्यांनी निविदा दरापेक्षा ५% ज्यादा दराने काम करण्याचे लेखी पत्र दि. ११.८.२००८ रोजी दिले आहे. चालु दरसुचीचे दर धरून कामाची अदयावत किंमत काढली असता निविदा धारकाची निविदा ही अदयावत किंमतीपेक्षा ५% ज्यादा येत आहे. सदरचे प्रस्ताव मा.छाननी समितीसमोर दिनांक १९.६.२००८ रोजी ठेवला असता छाननी समितीने सदरचे काम निविदा दरापेक्षा ५% दराने निविदा मंजुरीची शिफारस केली असुन मा. आयुक्त साहेबांनी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर निर्णयास्तव सादर करणे कामी सादर.

येणे प्रमाणे इले. सुपरवायझर श्री. बाळासाहेब सावळे यांचा अहवाल असे.दि.१२/८/०८

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महनगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ८ मधील रंगोली हॉटेल ते कारमिनल हायस्कुल पर्यत नवीन टयुबलर पोल फिटींग व अंन्डर ग्राउन्ड केबल टाकणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. [ अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ९,९०,५२५/-]

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक ८ मधील नवीन टयुबलर पोल फिटींग व अंन्डर ग्राउन्ड केबल टाकणे कामी आलेले कमीचे निविदा दरास मंजूरी देणे बाबत प्रस्ताव आहे.

मा. श्री. शेख आरिफ शे.र. :- ऑफिस रिपोर्टानुसार कमीचे दरास मंजूरी देण्यांत यावी.

मा.सौ. खरपुडे ज.सु.:- आलेले कमीचे दरास मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार आलेले कमीचे दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महनगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ८ मधील रंगोली हॉटेल ते कारमिनल हायस्कुल पर्यत नवीन टयुबलर पोल फिटींग व अंन्डर ग्राउन्ड केबल टाकणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता छाननी समितीने शिफारस केल्याप्रमाणे स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक मे. मयुरेश इलेक्ट्रिकल इंजिनिअर्स,अहमदनगर यांनी निगोशिएशन नंतर कमी करून दिलेल्या निविदा रकमे पेक्षा ५% ( पांच टक्के) जादाचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन.

अनुमोदक :- मा. सौ. खरपुडे जयश्री सुरेश.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**
सन २००८-२००९

विषय क्रमांक- ५ शुक्रवार दिनांक २९/८/२००८
ठराव क्रमांक -५ शुक्रवार दिनांक २९/८/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे नगररचना विभागामार्फत नागरिकांना आवश्यक असलेले झोन दाखले, भाग नकाशे, रेखांकन, बांधकाम आराखडे, सत्य प्रती इत्यादी पुरविण्यांत येणा-या कागद पत्रांसाठी आकारण्यात येणा-या प्रचलित दरास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** सादर,- नगररचना विभागामार्फत नागरिकांना वेगवेगळया कामासाठी आवश्यक असलेले झोन दाखले, भाग नकाशे, रेखांकन , बांधकाम आराखडे सत्यप्रती इत्यादी कागदपत्रे / नकाशे पुरविले जातात. ही सर्व कागदपत्रे / नकाशे पुरवतांना या कागदपत्रासाठी / नकाशांसाठी विवक्षित दर आकारण्यात येतात. हे दर सुमारे १९९९ पासुन प्रचलित आहे. असे उपलब्ध कागदपत्रावरून दिसते. मात्र हे दर निश्चित कोणत्या आदेशान्वये अथवा ठरावान्वये मंजुर करण्यात आले आहेत.याचे अभिलेख प्रयत्न करूनही उपलब्ध झाले नाहीत. या कामी पुर्वी हे काम पाहणारे श्री. तळेकर यांनाही या बाबत अनेक वेळा संपर्क केला असता त्यांनी असे दर उपलब्ध करून देण्यास असमर्थता दर्शविली असे असले तरी पुर्वी पासुन प्रचलित असलेल्या दर पत्रकाप्रमाणे शुल्क आकारण्याची कार्यवाही पुर्वी पासुन आहे. (सोबत दर पत्रक जोडले आहे.) तसेच मध्यंतरीच्या काळात विकास योजना ( वाढीव हद्द) या योजनेचे भाग नकाशे अथवा संपुर्ण विकास योजना नकाशा तसेच अहवाल पुरविण्याचे दर तत्कालीन मा.आयुक्त यांनी मंजुर केलेले आहेत. त्याप्रमाणे शुल्क आकारणे या विभागामार्फत सुरू आहे.

दरम्यानच्या काळात या दर पत्रकाबाबत श्री. दत्तात्रय प्रभाकर शेकटकर यांनी विचारलेल्या माहिती बाबत त्यांना हे दर प्रचलित दराप्रमाणे घेण्यात येत आहे असे कळविण्यांत आले आहे. त्या बाबत नाराज होवुन त्यांनी मा. माहिती आयुक्त मुंबई यांचेकडेस अपील सादर केले. या अपीलाची सुनावणी दिनांक ३१/७/२००८ रोजी नाशिक येथे मा.डॉ. सुरेश जोशी मा.राज्य माहिती आयोग मुंबई यांचे समोर झाली या सुनावणी दरम्यान त्यांनी हे प्रचलित दर मा.आयुक्त यांचे स्वाक्षरीने पाठविण्यास सुचित केले व अशा दरांना पुन्हा समुचित प्रधिका-यांचे मंजुरी घेणेबाबत सुचित केले महानगरपालिकेतील दर व कर ठरविण्याचे अधिकार मा. स्थायी समितीस असल्याने या दरांचा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती कडेस पाठविणे आवश्यक आहे.

सबब या प्रकरणी खालील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१) प्रचलित दर मा. आयुक्त यांचे स्वाक्षरी तात्काळ मा. माहिती आयुक्त यांना पाठविणे.
२) प्रचलित दरास पुन्हा मा.स्थायी समितीची मंजुरी घेणे

सबब प्रस्ताव मंजुरीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर.

येणे प्रमाणे मा. नगररचनाकार यांचा अहवाल असे.दि.११/८/०८

मा. उपायुक्त (कर) :- प्रस्तावीत मान्येतस्तव सादर. दि. ११/८/०८
मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि. ११/८/०८
मा.नगररचनाकार साहेब :- मा.स्थायी समितीस मंजुरीसाठी सादर. दि. ११/८/०८

**प्रचलित दर**

रेखांकन सत्य प्रत ट्रेसिंगसह एक प्रत २२०/- रूपये प्रती चौरस फुट जादाप्रतीसाठी + १००/- रूपये
बांधकाम सत्य प्रत ट्रेसिंगसह एक प्रत २५०/- रूपये प्रती चौरस फुट जादाप्रतीसाठी + १००/- रूपये.
भाग नकाशा १५०/- रूपये व २४०/- रूपये
बी फॉर्म साठी ६०/- रूपये
बांधकाम सत्य प्रत एका प्रती साठी ३०/- रूपये
रेखांकन सत्य प्रत एका प्रती साठी ६०/- रूपये
झोन दाखला ६०/- रूपये

गावठाण हद्द व गावठाण वगळता जुन्या हद्दीचा नकाशा २५/- रूपये प्रती चौरस फुट

सही/- सही/- सही/-

मा.नगररचनाकार, मा.उपायुक्त , मा.आयुक्त

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- नगररचना विभागामार्फत नागरिकांना देण्यांत येणा-या कागदपत्राच्या नक्ला साठी आकारण्यांत येणा-या प्रचलित दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ.पवार सं.बा. :- ऑफिस रिपोर्टानुसार मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार प्रचलित दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे नगररचना विभागामार्फत नागरिकांना आवश्यक असलेले झोन दाखले, भाग नकाशे, रेखाकंन, बांधकाम आराखडे, सत्य प्रती इत्यादी पुरविण्यांत येणा-या कागद पत्रांसाठी आकारण्यात येणा-या खालील प्रमाणेचे प्रचलित दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

रेखांकन सत्य प्रत ट्रेसिंगसह एक प्रत २२०/- रूपये प्रती चौरस फुट जादाप्रतीसाठी + १००/- रूपये
बांधकाम सत्य प्रत ट्रेसिंगसह एक प्रत २५०/- रूपये प्रती चौरस फुट जादाप्रतीसाठी + १००/- रूपये.
भाग नकाशा १५०/- रूपये व २४०/- रूपये
बी फॉर्म साठी ६०/- रूपये
बांधकाम सत्य प्रत एका प्रती साठी ३०/- रूपये
रेखांकन सत्य प्रत एका प्रती साठी ६०/- रूपये
झोन दाखला ६०/- रूपये

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ. पवार संध्या बाळासाहेब.

अनुमोदक :- मा. श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**
सन २००८-२००९

विषय क्रमांक- ६ शुक्रवार दिनांक २९/८/२००८

ठराव क्रमांक -६ शुक्रवार दिनांक २९/८/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १ मधील हुंडेकरी ट्रान्सपोर्ट ते आठरे पाटिल विद्यालय, नंदनवन नगर, अप्सरा कॉलनी, पवननगर , गोकुळ कॉलनी अंतर्गत १५० वॅट सोडियम व्हेपर पोल फिटींग व अन्डर ग्राउन्ड केबल टाकणे कामी मागविण्यात आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. [ अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ६३,४१,३९८/-]

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय-निविदा मंजुरी बाबत.

कामाचे नावं :- अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर प्रभाग क्र. १ मधील हुंडेकरी ट्रान्सपोर्ट ते आठरे पाटील विद्यालय, नंदनवन नगर, अप्सरा कॉलनी, पवननगर, गोकुळकॉलनी अंतर्गत १५० वॅट सोडिमय व्हेपर पोल, फिटींग व अंडर ग्राउंन्ड केबल टाकणेबाबत.

महोदय, उपरोक्त विषयी खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता :- मा.स्थायी समिती सभा क्र.१६ व विषय / क्र.१७ दि. १६/०२/२००८ अन्वये कामास प्रशासकीय मंजुरी.
२] प्रशासकीय मान्यता रक्कम :- रूपये ६३,४१,३९८/-
३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. :- रूपये ६३,४१,३९८/-
४] तांत्रिक मान्यतेची दरसुची :- २००७-२००८
५] निविदा ( परिशिष्ट 'ब') रक्कम :- रूपये ६३,४१,३९८/-
६] निविदा प्रसिध्दी तारीख :- दि. ०८/०५/२००८
७] निविदा विक्री कालावधी :- दि. ०९/०५/२००८ ते दि. २०/०५/२००८
८] निविदा स्विकारण्याची तारीख :- दि. २३/०५/२००८
९] निविदा उघडण्याची तारीख :- दि. २७/०५/२००८
१०] कामाची मुदत :- ६ महिने
११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालिल प्रमाणे :-

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | मे. शंतनु इलेक्ट्रिकल्स, मुंबई | ३० % ज्यादा |
| २ | मे. मोनार इलेक्ट्रिकल्स, मुंबई | २४.५ % ज्यादा |
| ३ | मे. आदित्य इलेक्ट्रिकल्स, मुंबई | २८ % ज्यादा |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने मे. मोनार इलेक्ट्रिकल्स, मुंबई यांचा देकार सर्वात कमी म्हणजे निविदा रकमेपेक्षा २४.५ % ज्यादा आहे. कमी दराच्या निविदा धारकास दि. १०/०६/२००८ रोजी दराचे वाटाघाटीसाठी पत्र दिले असता त्यांनी निविदा दरापेक्षा ९% ज्यादा दराने काम करण्याचे लेखी पत्र दि. २५/०६/२००८ रोजी दिले आहे. परंतु फेर वाटाघाटी करीता बोलाविले असता निविदा धारकाने ५% ज्यादा दराने काम करण्याचे मान्य केले आहे. चालु दरसुचीचे दर धरून कामाची अदयावत किंमत काढली असता निविदा धारकाची निविदा ही अदयावत किंमतीपेक्षा ५% ज्यादा येत आहे. सदरचा प्रस्ताव मा.छाननी समितीसमोर दिनांक ०१/०८/२००८ रोजी ठेवला असता छाननी समितीने सदरचे काम निविदा दरापेक्षा ५% जादा दराने निविदा मंजुरीची शिफारस केली आहे.

तरी सन २००७-२००८ चे अंदाजपत्रकानुसार रक्कम रू. ६३,४१,३९८/- असुन ५% ज्यादा ज्यादा दराने रक्कम रू. ६६,५८,४६७/- चे खर्चास मा.स्थायी समितीची मंजुरी मिळणेकामी निविदा मंजुरीस्तव सादर.

येणे प्रमाणे इले. सुपरवायझर श्री. बाळासाहेब सावळे यांचा अहवाल असे.दि.२०/०८/०८

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १ मधील हुंडेकरी ट्रान्सपोर्ट ते आठरे पाटिल विद्यालय, नंदनवन नगर, अप्सरा कॉलनी, पवननगर , गोकुळ कॉलनी अंतर्गत १५० वॅट सोडियम व्हेपर पोल फिटींग व अन्डर ग्राउन्ड केबल टाकणे कामी मागविण्यात आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. [ अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ६३,४१,३९८/-]

हा विषय सभे मध्ये॑ वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये॑ झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक १ मधील १५० वॅट सोडीयम व्हेपर पोल फिटींग व अन्डर ग्राउन्ड केबल टाकणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे दरास मंजूरी देणे विषयीचा प्रस्ताव आहे.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- ऑफिस रिपोर्टानुसार कमीचे दरास मंजूरी देण्यांत यावी.

मा.सौ. खरपुडे ज.सु. :- कमीचे दरास मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार आलेले कमीचे दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १ मधील हुंडेकरी ट्रान्सपोर्ट ते आठरे पाटिल विद्यालय, नंदनवन नगर, अप्सरा कॉलनी, पवननगर , गोकुळ कॉलनी अंतर्गत १५० वॅट सोडियम व्हेपर पोल फिटींग व अन्डर ग्राउन्ड केबल टाकणे कामी मागविण्यात आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता छाननी समितीने शिफारस केल्यानुसार स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक मे. मोनार इलेक्ट्रिकल्स , मुंबई यांनी फेर वाटाघाटी मध्ये कमी करून दिलेल्या निविदा दरापेक्षा ५% ( पांच टक्के) जादाचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा. श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन.

अनुमोदक :- मा.सौ.खरपुडे जयश्री सुरेश.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**
सन २००८-२००९

विषय क्रमांक- ७ शुक्रवार दिनांक २९/८/२००८

ठराव क्रमांक- ७ शुक्रवार दिनांक २९/८/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १३ मधील अण्णाभाउत्र साठे चौक ते कंरदीकर हॉस्पीटल ते बालीकाश्रम रस्त्यापर्यत डांबरीकरण करणे कामी मागविण्यात आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. [ अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १०,३०,९५९/-]

**प्रस्तावाचा मजकुर :-**कामाचे नावं :-प्र.क्र.१३ सिध्दार्थनगर मधील अण्णाभाउत्र साठे चौक ते करंदीकर हॉस्पीटल ते बालिकाश्रम रोड पर्यत रस्त्याचे डांबरीकरण करणे.

महोदय,

उपरोक्त विषयी खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता :- मा. जिल्हाधिकारी साहेब, क्र. सुजयो/वशी/७८८/२००८ यांची दि. २५/३/०८ अन्वये कामास मंजुरी

२] प्रशासकीय मान्यता रक्कम रू. :- १०,३०,९५९/-

३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. :- १०,३०,९५९/-

४] तांत्रिक मान्यतेची दरसुची :- २००७-२००८ सा.बां.वि.

५] निविदा ( परिशिष्ट 'ब') रक्कम :- १०,०५,२२९/-

६] निविदा प्रसिध्दी तारीख :- ६/६/०८ दै. पुण्यनगरी

७] निविदा विक्री कालावधी :- ६/६/०८ ते १३/६/०८ ( आठ दिवस)

८] निविदा स्विकारण्याची तारीख. :- १८/६/०८

९] निविदा उघडण्याची तारीख :- २६/६/०८

१०]कामाची मुदत :- ४ महिने

११]प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :-

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | श्री. एम.व्ही. दराडे | ४० % जादा |
| २ | श्री. अशोक सोनी मंडलेचा | २७ % जादा |
| ३ | श्री. संजय शहाणे | ३४ % जादा |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने श्री.अशोक सोनी मंडलेचा यांचा देकार सर्वात कमी म्हणजे २७% जादा आहे. वाटाघाटी मध्ये श्री. अशोक सोनी मंडलेचा यांना दिनांक १०/०७/२००८ रोजी वाटाघाटी करीता पत्र दिले असता त्यांनी सदर काम निविदा दरापेक्षा १६% कमी दराने करण्याची लेखी पत्र दिनांक ११/०७/२००८रोजी दिले आहे.सदर अद्यावत दर धरून सुधारित अंदाजपत्रक तयार केले असता निविदाधारकाची निविदा ही सुधारित अंदाजपत्रकापेक्षा ४.३३% जादा येत आहेत. सदरचा प्रस्ताव मा.छाननी समितीसमोर दिनांक ११/०७/२००८ रोजी ठेवला असता मा. छाननी समितीने सदरचे काम निविदा दरापेक्षा १६% जादा दराने काम करण्याची शिफारस केली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | सुधारीत देकारानुसार होणारी कामाची किंमत | ११,६६,०६६/- |
| २ | चालु दरसुची सन- ०७-०८अनुसार कामाची अद्यावत किंमत | ११,१७,६२९/- |
| ३ | ठेकेदाराची सुधारीत किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | ४८,४३७/- |
| ४ | चालु दरसुचीनुसार अधिक्याची टक्केवारी | ४.३३ % जादा |
| ५. | शेरा / अभिप्राय | खालीलप्रमाणे |

सदर निविदा सन २००७-०८ दरसुचीच्या तुलनेत ४.३३ % जादा येत आहे. सदर प्रस्तावास मा.स्थायी समितीची मंजूरी आवश्यक आहे.

यास्तव प्रस्ताव अवलोकनार्थ तसेच विषय मंजुरीसाठी मा.स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक १३ मधील डांबरीकरणाचे आलेले कमीचे दरास मंजुरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ. पवार सं.बा. :- ऑफिस रिपोर्टानुसार आलेले कमीचे दरास मंजूरी देण्यांत यावी.

मा.सौ. दिघे वि.रा. :- कमीचे दरास मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार आलेले कमीचे दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १३ मधील अण्णाभाउ साठे चौक ते करंदीकर हॉस्पीटल ते बालीकाश्रम रस्त्यापर्यत डांबरीकरण करणे कामी मागविण्यात आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता छाननी समितीने शिफारस केल्यानुसार स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा दरधारक श्री. अशोक सोनी मंडलेचा यांनी निगोशिएशन नंतर कमी करून दिलेल्या निवदा दरापेक्षा १६% ( सोळा टक्के) व सन २००७-२००८ चे दरसुची नुसार ४.३३% (चार पुर्णांक तेहतीस शतांश टक्के ) जादाचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ. पवार संध्या बाळासाहेब.

अनुमोदक :- मा.सौ. दिघे विमल रामचंद्र.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**
सन २००८-२००९

विषय क्रमांक- ८ शुक्रवार दिनांक २९/८/२००८
ठराव क्रमांक -८ शुक्रवार दिनांक २९/८/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे शहर पाणी पुरवठा योजने वरील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २००८-२००९ सालचे वार्षिक दर ठरविणे कामी मागविण्यांत आलेल्या गट क्रमांक १ ते ६ चे निविदा दराचे तुलनात्मक तक्ते व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुरः-** प्रस्तावना-विषय- अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेवरील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २००८-२००९ सालाकरिताचे गट क्र. १ ते ६ चे वार्षिक दर ठरविणेकामी मा.स्थायी समितीची मंजूरी मिळणेबाबत.

**टिप्पणी-** अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेवरील मुळानगर पंपींग स्टेशन, विळद पंपीग स्टेशन व जलशुध्दीकरण केंद्र नागापूर पंपीग स्टेशन व वसंतटेकडी पंपीग स्टेशन येथील पंप इलेक्ट्रीक मोटारी इत्यादीसह मुळानगर ते वसंतटेकडी दरम्यान दोन मुख्य जलवाहिन्या यांचे तातडीने दुरूस्ती कामे करणेसाठी मा.आयुक्त साहेब यांचे प्रशासकीय मंजूरीने जाहिर निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

वरील कामी गट क्र. १ ते ७ साठी एकुण कोरी निविदांची विक्री झाली होती. त्यापैकी निविदा स्विकृतीच्या वेळेत व मुदतीत गट क्र. १ ते ६ करिता एकुण १८ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त निविदा मा.उपायुक्त साहेब, मा.मुख्य लेखाधिकारी, मा.अंतर्गत लेखापरिक्षक व निविदाधारक यांचे समक्ष उघडून व तुलनात्मक तक्ता तयार करून कमीचे प्राप्त निविदाधारक यांचेशी निविदादरात वाटाघाटी करून मंजूरीसाठी सादर केलेल्या प्रस्तावामध्ये मा. मुख्य लेखापरिक्षक यांनी **गट क्र. ३ फेर निविदा मागविणे** योग्य, **गट क्र. ४, ५,६ मान्यतेस्तव सादर** व **गट क्र. १ व २** मधील प्राप्त निविदा दर हे निगोशिएशन नंतर सुध्दा सन २००७-०८ पेक्षा जास्तीचे दर असल्याने आणखी दर कमी करणे आवश्यक व त्यास संबंधीत पुरवठादार तयार नसल्यास सदर **गटाकरता फेरनिविदा मागविणे** योगय राहिल. व त्यानुसार मा.आयुक्त साहेब यांनी मा. स्थायी समिती मंजूरी घ्यावी असे निर्देशित केलेले आहे. अशाबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर मंजूरीस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे मेकॅ. इंजि. पाणी पुरवठा विभाग यांचा अहवाल असे दि. २१/८/०८

विषय:- अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजनेवरील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २००८-२००९ वार्षिक दर ठरविणेकामी गट क्र. १ ते ६ निगोशिएशन दर तक्ता.

| गट क्र. | अ. नं. | विषय | अंदाजे वार्षिक खर्च | निगोशिएशन अधिक दर | कमीचे निविदा दर धारकाचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | मुळानगर पंपीग स्टेशन येथील ५६० अश्वशक्ती पंपाचे दुरूस्तीबाबत | | निविदेमध्ये असलेल्या दराचे ५% कमीचे दर | श्री. दत्त स्टिल आणि इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीज, बुरूडगांव रोड, अ.नगर |
| १ | २ | विळद नवीन पंपहाउस मधील ३०० एच.पी व्ही.टी पंपाचे दुरूस्तीबाबत | | --"-- | --"-- |
| १ | ३ | विळद जुने पंपहाउसमधील ३०० एच.पी.[हॉरी]पंपाचे दुरूस्तीबाबत | १० लाख संपुर्ण गट | --"-- | --"-- |
| १ | ४ | मुळानगर व विळद नवीन पंपहाउस मधील २०० एच.पी. व्ही.टी. पंप दुरूस्तीबाबत. | | --"-- | --"-- |
| १ | ५ | वसंतटेकडी, आर.टी.ओ. टाकी इंडस्ट्रीयल इस्टेट, केडगांव येथील ६० अश्वशक्ती कपल पंप दुरूस्ती | | --"-- | --"-- |
| २ | १ | मुळानगर येथील ५६० अश्वशक्ती व्ही.टी. मोटार दुरूस्ती | | निविदेत असलेल्या दराच्या ५% कमीचे | अविहास इले.प्रा.लि.ए-२१ एम.आय.डी.सी,अ.नगर |
| | २ | विळद नवीन पंपहाउस व नागापूर पंपहाउस मधील ३०० एच.पी. व्ही.टी. मोटार दुरूस्तीबाबत | | --"-- | --"-- |
| | ३ | विळद जुने पंपहाउस येथील ३००एच.पी. हॉरीओन्टल मोटार दुरूस्ती | १० लाख संपुर्ण गट | --"-- | --"-- |
| | ४ | मुळानगर व विळद नवीन पंपहाउस येथील२००एच.पी. व्ही.टी मोटार दुरूस्ती | | --"-- | --"-- |
| | ५ | वसंतटेकडी,आर.टी.ओ.टाकी व इंडस्ट्रीयल इस्टेट केडगांव येथील ६० अश्वशक्ती मोटार दुरूस्ती | | --"-- | --"-- |

******

| गट क्र. | अ. नं. | विषय | अंदाजे वार्षिक खर्च | निगोशिएशन दर | कमीचे निविदा दर धारकाचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| ३ | १ | पाईप लाईन दुरूस्ती साहित्य | ४ लाख संपुर्ण गट | ५% कमीचे दर निविदा दरापेक्षा | श्री.दत्त स्टिल आणि इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीज, बुरूडगांव रोड, अ.नगर |
| ३ | २ | डिझेल जलरेटर सेट भाडयाने लावणे | | --"-- | --"-- |
| ३ | ३ | गॅस कटर सेट भाडयाने लावणे | | --"-- | --"-- |
| ३ | ४ | वेल्डींग मशिन सेट भाडयाने लावणे | | --"-- | --"-- |
| ३ | ५ | वेल्डींग करणे मृदू लोखंडी पाईप ५ मीटर | | --"-- | --"-- |
| ३ | ६ | गॅस कटरच्या सहाय्याने पाईप कट करणे | | --"-- | --"-- |

| गट क्र. | अ. नं. | विषय | अंदाजे वार्षिक खर्च | निविदा दर | निगोशिएशन दर | कमीचे दर निविदाधारकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | १ | क्रेन भाडयाने लावणे | २ लाख संपुर्ण गट | १०००/- | ९००/- | मयूर सप्लायर्स,अ.नगर |
| ४ | २ | जे.सी.बी./ तत्सम मशिन भाडयाने लावणे | | १२००/- | १०५०/- | --"-- |
| ४ | ३ | ब्रेकर भाडयाने लावणे | | ७५०/- | ७००/- | --"-- |
| ४ | ४ | सिमेंट क्रॉकीट ब्लॉक बनविणे. | | २९००/- | २८००/- | --"-- |

********

| गट क्र. | अ. नं. | विषय | अंदाजे वार्षिक खर्च | निविदा दर | निगोशिएशन दर | कमीचे दर निविदाधारकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | १ | फिल्टर मिडीया वाळू पुरविणे [ ग्रोथा सॅड] | २ लाख संपुर्ण गट | ५०००/- | ४५००/- | श्री.दत्त स्टिल आणि इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीज,बुरूडगांव,रोड,अ.नगर |
| ५ | २ | ब्लोअर मशिन गेअर ऑईल पुरविणे | | २२५/- | २००/- | --"-- |
| ५ | ३ | २५० एम.एम. स्ल्युस वॉलचे स्पिंडल बनविणे | | ६२५०/- | ५५००/- | --"-- |
| ५ | ४ | २५० एम.एम. स्ल्युस वॉलचे चेकनट बनविणे | | ५५००/- | ४०००/- | --"-- |
| ५ | ५ | ४५० एम.एम. स्ल्युस वॉलचे स्पिंडल बनविणे | | ९०००/- | ८०००/- | --"-- |
| ५ | ६ | ४५० एम.एम.स्ल्युस वॉलचे चेकनट बनविणे | | ८५००/- | ६०००/- | --"-- |
| ५ | ७ | ३०० एम.एम. स्ल्युस वॉलचे स्पिंडल बनविणे | | ७८००/- | ६५००/- | --"-- |
| ५ | ८ | ३०० एम.एम. स्ल्युस वॉलचे चेकनट बनविणे | | ७२५०/- | ६०००/- | --"-- |
| ५ | ९ | २५०/३००/४५० एम.एम स्लुस वॉलचे ग्लॅड बनविणे. | | २७५०/- | २०००/- | --"-- |
| ५ | १० | सर्वो १५० नंबर ऑईल पुरविणे | | ३००/- | २५०/- | --"-- |

---******--

| गट क्र. | अ. नं. | विषय | अंदाजे वार्षिक खर्च | निविदा दर | निगोशिएशन दर | कमीचे दर निविदा धारकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | १ | १६००के.व्ही.ए.ट्रान्सफॉर्मर दुरूस्ती | ६ लाख संपुर्ण गट | | | मे.सिक्रोंलेक इंडस्ट्रीज, एम.आय.डी.सी. अ.नगर. |
| | | | १ | ५००/- | ४७५/- | |
| | | | २ | ६/- | ६/- | |
| | | | ३ | ४२५०/- | ४०००/- | |
| | | | ४ | ५००/- | ५००/- | |
| | | | ५ | ७५०/- | ७००/- | |
| | | | ६ | २५०००/- | २४०००/- | |
| | | | ७ | १५००/- | १४००/- | |
| | | | ८ | ६५/- | ६५/- | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २ | १२५० के.व्ही.ए. ट्रान्सफॉर्मर दुरूस्ती | | | | मे.सिक्रोंलेक इंडस्ट्रीज, एम.आय.डी.सी. अ.नगर |
| | | | १ | ५००/- | ४७५/- | |
| | | | २ | ६/- | ६/- | |
| | | | ३ | ४२५०/- | ४०००/- | |
| | | | ४ | ५००/- | ५००/- | |
| | | | ५ | ७५०/- | ७००/- | |
| | | | ६ | २४५००/- | २३५००/- | |
| | | | ७ | १५००/- | १४००/- | |
| | | | ८ | ६५/- | ६५/- | |
| | ३ | ७५० के.व्ही.ए .ट्रान्सफॉर्मर दुरूस्ती | | | | --//-- |
| | | | १ | ५००/- | ४७५/- | |
| | | | २ | ६/- | ६/- | |
| | | | ३ | ३७५०/- | ३५००/- | |
| | | | ४ | ५००/- | ५००/- | |
| | | | ५ | ७५०/- | ७००/- | |
| | | | ६ | २२५००/- | २२५००/- | |
| | | | ७ | १५००/- | १४००/- | |
| | | | ८ | ६५/- | ६५/- | |
| | ४ | ५०० के.व्ही.ए .ट्रान्सफॉर्मर दुरूस्ती | | | | --//-- |
| | | | १ | ५००/- | ५००/- | |
| | | | २ | ६/- | ६/- | |
| | | | ३ | ३७५०/- | ३५००/- | |
| | | | ४ | ५००/- | ५००/- | |
| | | | ५ | ७५०/- | ७००/- | |
| | | | ६ | २००००/- | १९५००/- | |
| | | | ७ | १५००/- | १४००/- | |
| | | | ८ | ६५/- | ६५/- | |
| | ५ | २०० के.व्ही.ए. ट्रान्सफॉर्मर दुरूस्ती | | | | --//-- |
| | | | १ | ५००/- | ४७५/- | |
| | | | २ | ६/- | ६/- | |
| | | | ३ | ३२५०/- | ३०००/- | |
| | | | ४ | ५००/- | ५००/- | |
| | | | ५ | ५००/- | ५००/- | |
| | | | ६ | १५०००/- | १५०००/- | |
| | | | ७ | १५००/- | १४००/- | |
| | | | ८ | ६५/- | ६५/- | |

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग मेकॅ. इंजि.यांचा अहवाल असे
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे शहर पाणी पुरवठा योजने वरील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २००८-२००९ सालचे वार्षिक दर ठरविणे कामी मागविण्यांत आलेल्या गट क्रमांक १ ते ६ चे निविदा दराचे तुलनात्मक तक्ते व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- पाणी पुरवठा योजने वरील विविध दुरूस्तीचे कामाचे व साहित्याचे आलेले दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे. प्रस्तावाची माहिती सांगावी.

मा. सहाय्यक आयुक्त श्री. देशमुख साहेबः- मॅके. इंजि.श्री. निकम यांना सभेमध्ये बोलवावे ते सविस्तर माहिती सांगतील.

मा.सभापती साहेब :- मॅकेनिकल इंजि. यांना सभे मध्ये बोलावण्यात यावे.

त्याप्रमाणे मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. हे सभे मध्ये हजर झाले.

मा.सभापती साहेब :- पाणी पुरवठा योजने वरील दुरूस्तीचे व साहित्याचे निविदा दर मंजूरी साठी प्रस्ताव सादर केलेला आहे.त्याची माहिती सांगावी.

मॅके. इंजि.श्री. निकम पी.जे. :- पाणी पुरवठा योजने वरील मुळानगर पंपीग स्टेशन विळद पंपीग स्टेशन व नागापूर, वसंत टेकडी पंपीग स्टेशन येथील ५६०,३०० व २०० अश्वशक्ती इलेक्ट्रीक पंप व मुळानगर ते वसंत टेकडी दरम्यान चे पाईप लाईन दुरूस्तीचे व साहित्याचे आलेले कमीचे दरास मंजूरी मिळणे साठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- पाणी पुरवठा योजने वरील विद्युत पंप दुरूस्तीचे व साहित्याचे कमीचे दर मंजूरीसाठी सादर केलेल्या प्रस्तावामध्ये गट क्र. ३ चे दर जास्तीचे असल्याने फेरनिविदा काढणे योग्य,तसेच गट क्र. १ व गट क्र. २ मधील काही अनुक्रमांकाचे दर जास्तीचे असल्याचे मा. मुख्य लेखाधिकारी यांनी म्हटलेले होते.त्यानुसार संबधीत कमीचे निविदाधारक एजन्सीनां फेर निगोशिएशन करिता बोलविले असता त्यांनी बाजारातील सध्याच्या परिस्थीती नुसार दर योग्य असल्याचे म्हटलेले आहे. तसेच गट क्र.२ मधील दर हे सर्व करासहीत असल्याने जास्तीचे वाटत असल्याचे सांगितलेले आहे. तरी सध्याची बाजारातील परिस्थीती पाहता गट क्र.१ व गट क्र.२ चे आलेले कमीचे दर मान्य करणेस हरकत नाही असे वाटते. तसेच निविदा दराचे तक्त्या मधील गट क्रमांक ५,अ नं. १० या सर्वो १५० नंबर ऑईल पुरविणेचे रूपये तीनशे फक्त याप्रमाणे निविदा दर प्राप्त झालेले असुन निगोशिएशन मध्ये निविदा धारकांनी रूपये दोनशे पन्नास असे दर कमी करून दिलेले आहेत. पंरतु ते तक्त्यामध्ये रूपये तीनशे पन्नास असे चुकीने दर्शविलेले आहे ते रूपये दोनशे पन्नास असे आहेत.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. : आलेले कमीचे निविदा दरास मंजूरी देण्यांत यावी.

मा.सौ. खरपुडे ज.सु. :- मंजूर करावे.

मा.सभापती साहेबः-पाणी पुरवठा योजने वरील दुरूस्तीचे व साहित्याचे गट क्र.१,२,४,५व ६ चे कमीचे निविदा दरास व गट क्र.३चे फेर निविदा दर मागविण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे शहर पाणी पुरवठा योजने वरील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २००८-२००९ सालचे वार्षिक दर ठरविणे कामी मागविण्यांत आलेल्या गट क्रमांक १ ते ६ चे निविदा दराचे तुलनात्मक तक्ते व ऑफिस रिपोर्ट पहाता स्पर्धात्मक दृष्टया गट क्र.१ चे कमीचे निविदा दरधारक श्री. दत्त स्टिल आणि इलेक्ट्रीकल इंडस्ट्रीज, बुरूडगांव रोड,अ.नगर यांनी गट क्र.१ अ.नं.१ ते ५ चे पहिल्या निगोशिएशन नंतर कमी करून दिलेल्या कमीचे दरास, गट क्र. २ चे कमीचे निविदा दरधारक अविहास इले. प्रा.लि. ए-२१ एम.आय.डी.सी.,अ.नगर यांनी गट क्र.२ अ.नं. १ ते ५चे निगोशिएशन नंतर कमी करून दिलेल्या कमीचे दरास, गट क्र. चार चे कमीचे निविदा दरधारक मयुर सप्लायर्स,अहमदनगर यांनी गट क्रमांक चार अ.नं. एक ते चार चे निगोशिएशन नंतर कमी करून दिलेल्या कमीचे दरास , गट क्रमांक पांच चे कमीचे निविदा दरधारक दत्त स्टील आणि इलेक्ट्रीकल इंडस्ट्रीज बुरूडगांव रोड,अहमदनगर यांनी गट क्रमांक पांच अ.नं. एक ते दहा चे निगोशिएशन नंतर कमी करून दिलेल्या कमीचे दरास व गट क्रमांक सहा चे कमीचे निविदा दर धारक मे.सिक्रॉलेक इंडस्ट्रीज एम.आय.डी.सी.,अहमदनगर यांनी गट क्रमांक सहा चे अ.नं. एक ते पांच चे निगोशिएशन नंतर कमी करून दिलेल्या कमीचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच गट क्रमांक ३ चे दर जास्तीचे व अवाजवी असल्याने सदर गट क्रमांक ३ चे फेर निविदा मागविण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन.

अनुमोदक :- मा.सौ. खरपुडे जयश्री सुरेश.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**
सन २००८-२००९

विषय क्रमांक- ९ शुक्रवार दिनांक २९/८/२००८

ठराव क्रमांक- ९ शुक्रवार दिनांक २९/८/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ७ मधील केडगांव नवीन गांवठाण अंतर्गत व ताराबाई कन्या विद्यालय परिसरातील रस्त्याचे डांबरीकरणाचे काम मागासवर्गीय कल्याणकारी योजनेचे निधीतुन करणेस व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ८,५२,९५८/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना-विषय- प्रभाग क्र. ७ मध्ये केडगाव नवीन गावठाण अंतर्गत व ताराबाई कन्या विद्यालय परिसरातील रस्त्याचे डांबरीकरण करणे.

उपरोक्त विषयान्वये प्रभाग क्रमांक ७ मध्ये केडगाव नवीन गावठाण अंतर्गत व ताराबाई कन्या विद्यालय परिसरातील रस्त्याचे डांबरीकरण करणेचे काम मा.महापौर साहेब यांनी इकडेस यादी देउन सदर काम मागासवर्गीय कल्याणकारी निधीतून करणेचे सुचित केलेले आहे.

त्यानुसार सदर ठिकाणी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी रस्ता खडीकरण झालेला आहे. सदर रस्ता डांबरीकरण करणेचे कामाचे सविस्तर अंदाजपत्रक सन २००७-०८ च्या सार्व.बांध. विभागाच्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ८,५२,९५८/- इतकी आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता अहवाल असे

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक ७ मधील नवीन गांवठाण अंतर्गत डांबरीकरणाचे काम मागासवर्गीय कल्याणकारी योजनेचे निधितुन करणेस व खर्चास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ. दिघे वि.रा. :- ऑफिस रिपोर्टानुसार मंजूरी देण्यात यावी.

मा.सौ. पवार सं. बा. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यांत यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टास सर्वानुमते मंजूरी देण्यात यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ७ मधील केडगांव नवीन गांवठाण अंतर्गत व ताराबाई कन्या विद्यालय परिसरातील रस्त्याचे डांबरीकरणाचे काम मागासवर्गीय कल्याणकारी योजनेचे निधीतुन करणेस व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ८,५२,९५८/- ( रूपये आठ लाख बावन्न हजार नउशे अठ्ठावन्न फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ. दिघे विमल रामचंद्र.

अनुमोदक :- मा.सौ. पवार संध्या बाळासाहेब.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**
सन २००८-२००९

विषय क्रमांक- १० शुक्रवार दिनांक २९/८/२००८

ठराव क्रमांक- १० शुक्रवार दिनांक २९/८/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ७ मधील केडगांव नवीन गांवठाण येथील ओंकार कम्युनिकेशन ते पांच गोडावून ते हंगवले घर ते श्रीसंत कृपा ते दिक्षा ब्युटी पार्लर, साठे ते साळवे, राजे ते पांच गोडावून या मुख्य रस्त्याचे डांबरीकरणाचे काम मागासवर्गीय कल्याणकारी योजनेचे निधीतुन करणेस व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ८,२९,९७४/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना-विषय- प्रभाग क्र. ७ मध्ये केडगाव नवीन गावठाण येथील मुख्य रस्त्याचे ओंकार कम्युनिकेशन ते पाच गोडावून ते हंगवले घर ते श्रीसंत कृपा ते दिक्षा ब्युटीपार्लर, साठे ते साळवे, राजे ते पाच गोडावून पर्यत डांबरीकरण करणे.

उपरोक्त विषयान्वये प्रभाग क्र. ७ मध्ये केडगाव नवीन गावठाण येथील मुख्य रस्त्याचे ओंकार कम्युनिकेशन ते पाच गोडावून ते हंगवले घर ते श्रीसंत कृपा ते दिक्षा ब्युटीपार्लर, साठे ते साळवे, राजे ते पाच गोडावून पर्यत डांबरीकरण करणेचे काम मा. महापौर साहेब यांनी इकडेस यादी देउन सदर काम मागासवर्गीय कल्याणकारी निधीतून करणेचे सुचित केलेले आहे.

त्यानुसार सदर ठिकणी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी रस्ता खडीकरण झालेला आहे. सदर रस्ता डांबरीकरण करणेचे कामाचे सविस्तर अंदाजपत्रक सन २००७-०८ च्या सार्व. बांध. विभागाच्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ८,२९,९७४/- इतकी आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता अहवाल असे
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक ७ मधील रस्त्याचे डांबरीकरण मागासवर्गीय कल्याणकारी योजनेचे निधीतुन करणेस व खर्चास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. खरपुडे ज.सु. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र.७ मधील केडगांव नवीन गांवठाण येथील ओंकार कम्युनिकेशन ते पांच गोडावून ते हंगवले घर ते श्रीसंत कृपा ते दिक्षा ब्युटी पार्लर, साठे ते साळवे, राजे ते पांच गोडावून या मुख्य रस्त्याचे डांबरीकरणाचे काम मागासवर्गीय कल्याणकारी योजनेचे निधीतुन करणेस व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ८,२९,९७४/- (रूपये आठ लाख एकोणतीस हजार नउशे चौ-याहत्तर फक्त)चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन.

अनुमोदक :- मा.सौ. खरपुडे जयश्री सुरेश.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**
सन २००८-२००९

विषय क्रमांक- ११ शुक्रवार दिनांक २९/८/२००८

ठराव क्रमांक- ११ शुक्रवार दिनांक २९/८/२००८

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र.७ मधील केडगांव नवीन गावठाण दत्त मंदिर परिसरातील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरणाचे काम मागासवर्गीय कल्याणकारी योजनेचे निधीतुन करणेस व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ४,९९,२६१/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना-विषय- प्रभाग क्र. ७ मध्ये केडगाव नवीन गावठाण दत्त मंदिर परिसरातील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे.

उपरोक्त विषयान्वये प्रभाग क्र. ७ मध्ये केडगाव नवीन गावठाण दत्त मंदिर परिसरातील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेचे काम मा. महापौर साहेब यांनी इकडेस यादी देउन सदर काम मागासवर्गीय कल्याणकारी निधीतून करणेचे सुचित केलेले आहे.

त्यानुसार सदर ठिकणी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी रस्ता खडीकरण झालेला आहे. सदर रस्ता डांबरीकरण करणेचे कामाचे सविस्तर अंदाजपत्रक सन २००७-०८ च्या सार्व. बांध. विभागाच्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ४,९९,२६१/- इतकी आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता अहवाल असे

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक ७ मधील रस्त्याचे डांबरीकरणाचे काम मागासवर्गीय कल्याणकारी योजनेचे निधीतुन करणेस व खर्चास मंजूरी देणे बाबत प्रस्ताव आहे.

मा.सौ. पवार सं.बा. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. दिघे वि.रा. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र.७ मधील केडगांव नवीन गावठाण दत्त मंदिर परिसरातील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरणाचे काम मागासवर्गीय कल्याणकारी योजनेचे निधीतुन करणेस व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ४,९९,२६१/- ( रूपये चार लाख नव्याण्णव हजार दोनशे एकसष्ठ फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा. सौ. पवार संध्या बाळासाहेब.

अनुमोदक :- मा.सौ.दिघे विमल रामचंद्र.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**

सन २००८-२००९

विषय क्रमांक- १२ शुक्रवार दिनांक २९/८/२००८

ठराव क्रमांक- १२ शुक्रवार दिनांक २९/८/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १ मधील नागापुर स्लम भागातील अंतर्गत रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. [ अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ११,४९,६३०/-]

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय-निविदा मंजुरी बाबत.

कामाचे नाव :- प्रभाग क्रमांक. १ नागापुर स्लम भागात अंतर्गत रस्ते मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.

महोदय,

उपरोक्त विषयी खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता :- मा. स्थायी समिती यांची दि.२१/९/०७ अन्वये कामास मंजुरी

२] प्रशासकीय मान्यता रक्कम रू. :- ११,४९,६३०/-

३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. :- ११,४९,६३०/-

४] तांत्रिक मान्यतेची दरसुची :- २००७-२००८

६] निविदा ( परिशिष्ट 'ब') रक्कम रू. :- १०,९४,८८६=००

७] निविदा प्रसिध्दी तारीख :- ६/०६/०८ दै. पुण्यनगरी ( फेर निविदा)

८] निविदा विक्री कालावधी :- ०६/०६/२००८ ते १३/०६/२००८ ( १५ दिवस)

९] निविदा स्विकारण्याची तारीख. :- १८/०६/२००८

१०] निविदा उघडण्याची तारीख :- २६/०६/२००८

११] कामाची मुदत :- ४ महिने

११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | श्री. एम.व्ही. दराडे,अ.नगर | २६ % जादा |
| २ | श्री. संजय शहाणे,अ.नगर | ४० % जादा |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने श्री. एम.व्ही.दराडे,अ.नगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे निविदा रकमेपेक्षा २६.००% जादा आहे. सुधारीत दराशी तुलना करता सदरचे दर हे २६% जादा आहेत. कमी दराचे निविदा धारकास दि. १/७/०८ रोजी दराचे वाटाघाटीसाठी पत्र दिले असता, त्यांनी निविदा दरापेक्षा १७.५५ % जादा दराने काम करणेचे कळविलेनुसार सदर प्रस्ताव छाननी समिती समोर दिनांक ११/७/०८ ठेवला असता सदर काम श्री.एम.व्ही.दराडे, अहमदनगर यांचा चालू दरसुचीच्या तुलनेत ४.७१ % जादा दर येत असल्याने निविदा दरापेक्षा १७.५५% जादा दराने देणेची शिफारस करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| १२ | सुधारीत देकारानुसार येणारी किंमत | १२,८७,०३९/- |
| १३ | चालु दरसुची सा.बा. ०७-०८अनुसार कामाची अद्यावत किंमत | १२,२९,१०५/- |
| १४ | ठेकेदाराची सुधारीत किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | ५७,९३४/- |
| १५ | चालु दरसुचीनुसार अधिक्याची टक्केवारी (१२ x१००)<br>२ | ४.७१ % जादा |
| १६ | शेरा / अभिप्राय | खालीलप्रमाणे |

सदर निविदा चालू दरसुचीच्या तुलनेत ४.७१ % जादाची आहे.

यास्तव प्रस्ताव अवलोकनार्थ तसेच विषय मंजुरीसाठी मा.स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १ मधील नागापुर स्लम भागातील अंतर्गत रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. [ अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ११,४९,६३०/-]

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक १ मधील रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे कामी आलेले निविदा दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ. पवार सं.बा. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार आलेले कमीचे निविदा दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १ मधील नागापुर स्लम भागातील अंतर्गत रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता छाननी समितीने शिफारस केल्याप्रमाणे स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक श्री. एम.व्ही. दराडे,अ.नगर यांनी निगोशिएशन नंतर कमी करून दिलेल्या निविदा दरापेक्षा १७.५५% ( सतरा पुर्णांक पंचावन्न शतांश टक्के ) जादाचे व चालु दर सुचीच्या तुलनेत ४.७१% (चार पुर्णांक एक्काहत्तर शतांश टक्के) जादाचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा. सौ. पवार संध्या बाळासाहेब.

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**
सन २००८-२००९

विषय क्रमांक- १३ शुक्रवार दिनांक २९/८/२००८

ठराव क्रमांक- १३ शुक्रवार दिनांक २९/८/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १८ स्वामी विवेकानंद पुतळा चौक येथील म.न.पाचे शितळा देवी पटांगणा मधील प्रगतीत असणा-या व्यायाम शाळेच्या बांधकामामध्ये करावयाच्या वाढीव कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २,४९,२९७/- चे वाढीव खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय- प्र.क्र. १८ स्वामी विवेकानंद पुतळा चौक येथील म.न.पा.चे शितळादेवी पटांगण येथील प्रगतीत असणा-या व्यायामशाळेच्या बांधकामामध्ये वाढीव कामास मंजुरी मिळणेबाबत.

संदर्भ :- मा.नगरसेवक श्री. कुलकर्णी नरेंद्र सच्चिदानंद यांचे दि. २१/१/०८ चे पत्र.

उपरोक्त संदर्भिकिंत विषयान्वये विनंती प्रस्ताव की, शितळादेवी पटांगण येथील महानगरपालिकेच्या जागेत रक्कम रू. ९,९७,७००/- ची नवीन व्यायामशाळा बांधणेचे काम पुर्णत्वास आले असुन मुळ अंदाजपत्रकात फ्लोरिंगसाठी मोझक टाईल्स व झेड सेक्शनच्या खिडक्यांचा वाव प्रस्तावीत आहे. मात्र प्र.क्र. १८ चे मा. नगरसेवक श्री. नरेंद्र सच्चिदानंद कुलकर्णी यांनी मूळ अंदाजपत्रकातील वरील तरतुदीऐवजी फ्लोअरिंगसाठी पॉलीश कोटा फरशी, खिडक्यांना लोखंडी ग्रील मधून आतील बाजूस अॅल्युमिनियम स्लाईडिंग च्या खिडक्या, प्लॅबिंग, विद्युत कामे इ. मुळअंदाजपत्रकात समाविष्ट करून सदर व्यायामशाळेचे काम करणेची मा.आयुक्त साहेब यांचेकडेस समक्ष भेट घेवून चर्चा केली व त्याबाबत संदर्भिय पत्रान्वये मागणी केली आहे. सदर कामांची आवश्यकता असलेने सदर कमासाठी सोबतचे कमी जादा खर्चाचे तक्त्यानुसार वाढीव कामासह अंदाजपत्रकीय रक्कम रू. १२,४६,५४६/-होत असुन वाढीव खर्च रक्कम रू. २,४९,२९७/- होत आहे.

सदरचा खर्च सन २००७-०८ चे अंदाजपत्रकीय" इमारत दुरूस्ती" या लेखाशिर्षातून करता येईल. तरी सदरचे वाढीव काम सध्या काम करीत असलेल्या ठेकेदारामार्फत अंदाजपत्रकीय रकमेत करून घेणेस तदअनुषंगीक खर्च रू. २,४९,२९७/- चे खर्चास मा.स्थायी समितीची मंजुरीची आवश्यकता आहे.

सदर प्रस्तावास मा.आयुक्त साहेब यांनी संमती दिलेली आहे. यास्वत सदर प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे ठेवणे करिता सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.
हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक १८ मधील शितळादेवी पटांगणातील व्यायाम शाळेच्या करावयाच्या बांधकामाचे वाढीव कामास व खर्चास मंजूरी देणे बाबत प्रस्ताव आहे.

मा.सौ. खरपुडे ज.सु. :- ऑफिस रिपोर्टानुसार मंजूरी देण्यांत यावी.

मा.सौ. दिघे वि.रा. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १८ स्वामी विवेकानंद पुतळा चौक येथील म.न.पाचे शितळा देवी पटांगणा मधील प्रगतीत असणा-या व्यायाम शाळेच्या बांधकामामध्ये करावयाच्या वाढीव कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २,४९,२९७/- ( रूपये दोन लाख एकोणपन्नास हजार दोनशे सत्याण्णव फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ. खरपुडे जयश्री सुरेश.

अनुमोदक :- मा. सौ. दिघे विमल रामचंद्र.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**
सन २००८-२००९

विषय क्रमांक- १४ शुक्रवार दिनांक २९/८/२००८

ठराव क्रमांक- १४ शुक्रवार दिनांक २९/८/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या प्राथमिक शाळेतील तीनशे विद्यार्थाची ऐतिहासिक सांस्कृतिक व शैक्षणिक सहल आयोजित करणे बाबत डायरेक्टर केंट क्लाब कोल्हापूर यांचे पत्र व त्या वरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** सादर,

विनंती रिपोर्ट की, केंट क्लब कोल्हापुर यांच्या संचालकांसी दिनांक १८/०८/२००८रोजी सायंकाळी ७-०० वाजता झालेल्या चर्चेप्रमाणे व त्यांनी सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहलीसाठी प्रत्येकी रूपये २,०५०/- प्रमाणे खर्च होणार असल्याचे सांगितले आहे व तसा प्रस्ताव आहे.

महानगरपालिका शाळेतील एकुण ९( नउ) शाळामधील इयत्ता ५ वी ते ७ वी ची विद्यार्थी संख्या- ३०० इतकी आहे. प्रत्येकी २,०५०/- प्रमाणे रू. ६,१५,००/- इतका खर्च आहे. महानगरपालिका शिक्षण मंडळाकडे व सर्व शिक्षा अभियान मध्ये सहल या शिर्षकाखाली कोणतीही तरतुद मंजूर नाही. तथापी राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडे सदर खर्च शैक्षणिक सहल तरतुदीखाली मा.आयुक्त यांनी जा.नं. साप्रवि १८५० दि. २२/०८/२००८ रोजीचे पत्र प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचेकडे दिले आहे व शैक्षणिक सहलीच्या खर्चाची तरतुद करणेस मान्यता मागितलेली आहे. परवानगी आल्यानंतर सदरची तरतुद मनपाकडे वर्ग करण्यात येईल.

पुढील आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे प्रशानाधिकारी, महानगरपालिका शिक्षण मंडळ यांचा अहवाल असे
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा. सभापती साहेब :- म.न.पा.चे शाळा मधील विद्यार्थाची सहल आयोजित करणेस व खर्चास मंजूरी मिळणे बाबतचा प्रस्ताव आहे. सदरचे सहलीकरितां आर्थिक तरतुद नसल्याने सदर चा खर्च कसा करणार याबाबत माहिती सांगावी.

मुख्य लेखा अधिकारी श्री. कर्डीले पी.बी.:- शिक्षण मंडळास रक्कम रूपये एक कोटी सत्तावीस लाख अनुदान देणे आहे. त्यांना देण्यात येणा-या अनुदानामधून सदरचा खर्च करणेत यावा.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- मा.आयुक्त, मा.उपायुक्त श्री. जावळे साहेब, मुख्य लेखा अधिकारी श्री. कर्डीले साहेब व शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी यांनी या प्रकरणी आर्थिक तरतुद करून सहल आयोजनाबाबत पुढील कार्यवाही करावी.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- सहल आयोजनास खर्च मंजूरी देण्यात यावी.

मुख्य लेखा अधिकारी श्री. कर्डीले पी.बी. :- शिक्षण मंडळाचे अनुदान रक्कम रूपये एक कोटी सत्तावीस लाख देणे आहे. त्यापैकी सहलीसाठी येणारा खर्च रूपये दहा लाख फक्त ची रक्कम शिक्षण मंडळाकडेस वर्ग करणेत यावी. त्या रकमे मधून शिक्षण मंडळ सदरचे सहलीचे आयोजनाबाबत पुढील कार्यवाही करील.

मा.सौ. खरपुडे ज.सु.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेबः-ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.शिक्षण मंडळास देय्य असलेल्या रकमे मधून सहल आयोजिनासाठी रक्कम रू. दहा लाख फक्त शिक्षण मंडळाकडेस वर्ग करणेस मंजूरी देण्यांत यावी.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या प्राथमिक शाळेतील तीनशे विद्यार्थाची ऐतिहासिक सांस्कृतिक व शैक्षणिक सहल आयोजित करणे बाबत डायरेक्टर केंट क्लाब कोल्हापूर यांचे पत्र व त्या वरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या प्राथमिक शाळेतील तीनशे विद्यार्थाची ऐतिहासिक सांस्कृतिक व शैक्षणिक सहल आयोजित करणे बाबत प्रशासनाधिकारी म.न.पा. शिक्षण मंडळ यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार सदरचे डायरेक्टर, केंट क्लब, कोल्हापूर यांचे पत्रानुसार म.न.पा. शिक्षण मंडळाच्या प्राथमिक शाळेतील तीनशे विद्यार्थांची सहल आयोजित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

तसेच म.न.पा.चे शिक्षण मंडळास देय्य असलेल्या त्यांचे हिस्साचे रकमे पैकी रू.१०,००,०००/- (रूपये दहा लाख फक्त) त्यांचे कडेस सहल आयोजनासाठी वर्ग करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.
सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन.

अनुमोदक :- मा.सौ. खरपुडे जयश्री सुरेश.
ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.